MHKO110003932019

**दिवाणी किर. अर्ज क्र. १२ / २०१९.**
(CNR No.**MHKO110003932019**)

## निशाणी क्र. ३३ खालील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज मूळ अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये त्यांचा मूळ अर्ज दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांचे अर्जातील कथन की, प्रस्तुतचा मूळ अर्ज त्यांनी भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये टंकलेखनाच्या चुकीमुळे विनंती कलमामध्ये "ठराव व हुकूमनामा व्हावा" असे टंकलिखित झाले आहे. त्याऐवजी "वारसा दाखला मिळावा" असे नमूद करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांना सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

०३. अर्जदारांचे पुढील कथन की, ते सुचवत असलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरूपाची आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस विरोधीपक्षाचे (वि.प.) काहीही नुकसान होणार नाही. तसेच, मागितलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असलेने सदरची दुरुस्ती मंजूर होणे अत्यंत निकडीचे आहे. तसेच, दुरुस्ती नंतर मूळ अर्जाच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रस्तुत अर्जावर वि.प. यांचे म्हणणे मागविण्यात आले होते. मात्र त्यांनी मुदतीत म्हणणे सादर न केल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्यात आला आहे.

०५. अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार तर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०६. पुढील विवेचन करण्यापूर्वी या ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ६ नियम १७ मधील खाली नमूद कायदेशीर तरतूद पाहणे उचित ठरेल.

**१७. वादकथनातील सुधारणा** -

न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही

पक्षकारांस, त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत.

परंतु न्यायचौकशी सुरू झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुन सुद्धा न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा मूळ अर्ज हा वारसा दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जात नमूद केलेली चूक ही टंकलेखनाची असून ती किरकोळ स्वरूपाची आहे. तसेच सदर दुरुस्ती नंतर मूळ आर्जच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी मूळ अर्जाचा गुणदोषांवर अंतिम न्यायनिवाडा करणेकामी प्रस्तावित सुधारणा ही क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्जदार यांचा निशाणी क्र.३३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत आदेशाचे तारखेपासुन १४ दिवसांच्या आत अर्जात नमूद केल्यानुसार मूळ अर्जात दुरुस्ती करून, मूळ अर्जाची दुरुस्ती प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. येणेप्रमाणे निशाणी क्र.३३ वरील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

**(एल. एम. पठाण)**

दिनांक. ११/०१/२०२४. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव